प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. कांतीलाल मांगीलाल जाधव वय ५१ वर्ष पद अव्वल कारकुन, वर्ग –३ जिल्हा पुनर्वसन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,०००/– रूपये |
| घटनास्थळ | जिल्हा पुनर्वसन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा |
| घटना तारीख | २३.१२.२०२० |

थोडक्यात हकीकत :– यातील तक्रारदार यांचे शेत जिगांव प्रकल्पाच्या क्षेत्रात येत असुन त्यापैकी १.६४ आर शेती जिगांव प्रकल्पासाठी राखीव असुन सदर राखीव क्षेत्र गट क्र ५४८ पोट खराब वगळता लागवड योग्य क्षेत्रातुन तक्रारदार यांचे मूलांचे नावावर शेतजमीनीचे बक्षीसपत्र करण्याचे परवानगीचे काम करुन देण्यासाठी लोकसेवक श्री कांतीलाल जाधव, पद अव्वल कारकुन, जिल्हा पुनर्वसन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा हे १,०००/– रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबतची तक्रार ॲन्टी करप्शन ब्युरो बूलडाणा घटकाकडे नोंदविली होती.

सदर तक्रारीवरुन आज दिनांक २३.१२.२०२० रोजी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता लोकसेवक श्री कांतीलाल जाधव, पद अव्वल कारकुन, जिल्हा पुनर्वसन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा,यांनी तक्रारदार यांना त्यांचे मूलांचे नावावर शेतजमीनीचे बक्षीसपत्र करण्याचे परवानगीचे काम करुन देण्यासाठी पंच क्रमाक १ यांचे समक्ष १,०००/– रूपये लाचेची मागणी केली व लाच स्विकारण्याची तयारी दर्शविलयाने आज दिनांक २३.१२.२०२० रोजी रितसर सापळा कार्यवाही आयोजित केली असता लोकसेवक कांतीलाल जाधव यांनी पंच क्र. १ यांचेसमक्ष लाचेची रक्कम १,०००/– रुपये स्विकारली.

तरी लोकसेवक लोकसेवक श्री कांतीलाल जाधव, पद अव्वल कारकुन, वर्ग ३, जिल्हा पुनर्वसन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा, रा. घर क्रमांक ५ पितांबर कृपा अभिनव नगर, जलंब नाका खामगांव, ह.मु. विष्णु स्वरुप बालाजी अपार्टमेंट, तिसरा माळा खामगांव रोड, बुलडाणा यांनी आपले लोकसेवक पदाचा गैरवापर करुन स्वत:साठी पैश्याचे स्वरुपातील अर्थिक लाभ मिळविण्यासाठी लोकसेवक पदाला न शोभनारे गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतीबंधक अधिनियम १९८८(संशोधन २०१८) प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर कार्यवाही :– १. मा. श्री. विशाल गायकवाड पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. गजानन पडघन, प्रभारी अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती

यांचें मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी रामकृष्ण मळघणे, पोलीस उपअधिक्षक व सापळा पथकातील स्टाफ नापोका. विलास साखरे, मो. रिजवान, रविंद्र दळवी, सुनिल राऊत, पोकॉ. विजय मेहत्रे व चालक पोकॉ मधुकर रगड यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व ८००७२८८६०६ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे

(रामकृष्ण मळघणे)
पोलीस उपअधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner